बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अंतर्गत प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापकाची अतिरिक्त पदे मंजूर करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्र. पीआरई-२०११/प्र.क्र.२७५/प्राशि-१

मंत्रालय विस्तार भवन मुंबई-४०० ०३२

दिनांक -७ डिसेंबर, २०११.

**पहा-** १) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.पीआरई-२०१०/प्र.क्र.२१७/प्राशि-१ दि.१८-६-२०१०.

२) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.प्राशिसं-२०१०/शि.भरती/ड-५०२/१०२६ दि.७-२-२०११.

३) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांचे पत्र क्र. मप्राशिप/सशिश/पशि-२०१०-११/४०९, दि.२० जानेवारी २०११.

**प्रस्तावना**:- केंद्र सरकारने सन २००२ च्या ८६ व्या संविधान -विशोधन अधिनियमान्वये अनुच्छेद २१ (अे) मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला आहे. त्यानुसार सहा ते चौदा वयोगटातील सर्व **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** (Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009) (No.35, 2009), केंद्र शासनाने पारित करुन तो भारत सरकारच्या २७.८.२००९ च्या राजपत्रात प्रसिध्द केला आहे. तसेच, भारत सरकारच्या दिनांक १६.२.२०१० च्या राजपत्रात सदर अधिनियम दिनांक १.४.२०१० पासून संपूर्ण भारतात (जम्मू व काश्मिर वगळता) लागू केला असल्याचे नमुद केले आहे. तसेच **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** अंतर्गत राज्याची नियमावली दि.११-१०-२०११ रोजी प्रसिध्द झाल्यामुळे सदर कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाने सर्व शिक्षा अभियानाच्या सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पास मान्यता दिली आहे. त्यामध्ये **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने प्राथमिक शिक्षक व इतर अनुषंगीक पदे निर्माण करण्यास मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने राज्यामध्ये ही पदे निर्माण करणे व भरणे याबाबतचे आदेश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>:- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** कायद्याची अमलबजावणीसाठी केंद्र शासनाने सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमासाठी एकूण ३४,५९४ नवीन पदे निर्माण करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यानुसार राज्य शासन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेसाठी खालीलप्रमाणे एकूण ३४,५९४ प्राथमिक शिक्षक व इतर अनुषंगीक पदे निर्माण करण्यास मंजूरी देत आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदांची वेतनश्रेणी रुपये | मंजूर पदांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक शाळांमध्ये अतिरिक्त शिक्षक | ५२००-२०२००+ग्रेड पे २८०० | १२,६०० |
| २ | प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक | ९३००-३४८००+ग्रेड पे ४३०० | ११,८७८ |
| ३ | उच्च प्राथमिक शाळेचे अतिरिक्त शिक्षक | ५२२००-२०२००+ग्रेड पे २८०० | २०५ |
| ४ | उच्च प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक | ९३००-३४८००+ग्रेड पे ४३००, | १,३३४ |
| ५ | अंशकालीन निदेशक | कामाच्या तासिकाप्रमाणे | ८,५७७ |
| एकूण | | | ३४,५९४ |

२. सर्व शिक्षा अभियन कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाने मंजूर केलेल्या विषयनिहाय बाबींसाठी राज्यस्तरावरुन प्रशासकीय मंजूरी आदेशासाठी मा. मुख्यसचिव यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती स्थापन करण्यात आलेली असून या कार्यकारी समितीमध्ये उच्चस्तरीय समितीमधील सर्व सदस्यांचा समावेश आहे. या अतिरिक्त नवीन पदांच्या प्रस्तावास केंद्र शासनाच्या Project Approval Board यांच्या बैठकीत मंजूरी दिलेली असून त्यानुसार वरील पदे मंजूरीबाबतचा ठराव दि.२०-४-२०११ रोजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीने मंजूर केला आहे. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या मेमोरँडम ऑफ असोसीएशन आणि त्याखालील तयार करण्यात आलेल्या नियमांनुसार महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे उद्देश व सर्व कार्याची जबाबदारी साध्य करण्याची जबाबदारी कार्यकारी समितीची आहे. त्याप्रमाणे कार्यकारी समितीस प्रशासकीय व वित्तीय अधिकार आहेत. याशिवाय नविन पदे निर्माण करणे व त्यानुषंगाने नेमणूक करण्याचे अधिकार आहेत. सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाबाबतचे सर्व निर्णय कार्यकारी समितीच्या मान्यतेने घेण्यात येतात.

३.  **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी त्या अनुषंगाने आवश्यक अतिरिक्त नवीन पदांच्या प्रस्तावास केंद्र शासनाच्या Project Approval Board यांच्या बैठकीत मंजूरी दिलेली असून त्यानुसार वरील पदे मंजूरीबाबतचा ठराव मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारी समितीन दि.२०-४-२०११ रोजी पारीत केला आहे.

४.  ही पदे जिल्हानिहाय व आस्थापनानिहाय वितरीत करण्याची जबाबदारी शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील. तसेच शिक्षकांची पदे ही विहीत पध्दतीने केंद्रीय भरतीपूर्व निवडपरीक्षेव्दारे व मुख्याध्यापकांची पदे ही पदोन्नतीने भरावयाची आहेत. या नवीन पदांसाठी येणार वित्तीय भार हा सर्वशिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत मंजूर तरतूदीतून भागविला जाईल.

५. याशिवाय कला शिक्षक, शारिरिक शिक्षक या पदांचाही आवश्यकतेनुसार जिल्हायनिहाय व आथापनानिहाय वितरीत करण्याची जबाबदारी शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील. ही **अंशकालीक पदे विहीत कार्यपध्दतीने भरण्यात यावीत.**

६

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक क्र २०१११२०७१०५५३५००१असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(झं.सा.रणदिवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक (माध्य.व उच्च माध्य.), महाराष्ट्र राज्य,पुणे.
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणें
राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,चर्नीरोड, मुंबई.
आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ, पुणे.

संचालक, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था, पुणे.
शिक्षण संचालक (प्रौढ), महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद.
सर्व विधान सभा सदस्य, महाराष्ट्र विधान मंडळ,
सर्व विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधान मंडळ,
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन मुंबई
सर्व प्रशासन अधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळ
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषदा,
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सामान्य प्रशासन विभाग,
सर्व कार्यासने शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
निवड नस्ती/प्राशि-१

-------